श्री.तुळजादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जालना संचलित अपंग निवासी विद्यालय, वाटूर, तालुका-परतूर, जिल्हा-जालना या अस्थिव्यंग प्रवर्गातील विशेष शाळेचे जालना येथे स्थलांतर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र. इडीडी-२०१६/प्र.क्र.१७०/अ.क.१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १० ऑक्टोबर,२०१७.

वाचा:- १) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्रमांक अकआ/प्र-३ अस्थि/ तुळजादेवी/ स्थलांतर/जालना/ २०१६/२९९९ दिनांक १८ ऑक्टोबर,२०१६.
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इडीडी- २०१७/ प्र.क्र.६/अ.क.१ दिनांक १६ सप्टेंबर,२०१७.

प्रस्तावना :-

श्री.तुळजादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जालना संचलीत अपंग निवासी विद्यालय, वाटुर, जि.जालना या शाळेचे नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक ०४३०, दि.२८.०४.१९९९ असे असून शाळेस ४० निवासी अनुदानित विद्यार्थी संख्या मंजूर आहे. सदर शाळेची इमारत जुनी आणि विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने अपुरी आहे. संस्थेने जालना येथे शाळेकरिता भाड्याने इमारत घेतली असल्याने शाळा स्थलांतर करण्यास परवानगी मिळण्याचा प्रस्ताव जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जालना तसेच आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी शासनाकडे शिफारशीसह पाठविला होता.

संस्थेने प्रवेशित विद्यार्थ्यांना स्थलांतरीत ठिकाणी प्रवेश देण्याचे हमीपत्र सादर केले आहे. शाळा स्थलांतरणास स्थानिक जनतेचा विरोध नाही. प्रस्तावित स्थलांतराच्या ठिकाणी १० कि.मी. परिसरात अन्य विशेष शाळा नाहीत. शाळेच्या जुन्या व प्रस्तावीत स्थानामधील अंतर अंदाजे ४० कि.मी. इतके आहे. प्रस्तावित स्थलांतर एकाच जिल्ह्यात होणार आहे. शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना अपंग व्यक्ती समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग अधिनियम, १९९५ तसेच अपंग शाळा संहिता, १९९७ मध्ये शासनाने ठरवून दिलेले निकष, नियम व निर्णयाचे अनुषंगाने अत्यावश्यक सोयी सुविधा मिळण्याच्या दृष्टीने संस्थेने सादर केलेले मागणीपत्र, कार्यकारी मंडळाचा ठराव, कर्मचारी संमतीपत्र प्रस्तावासोबत सादर केले आहेत. त्यानुषंगाने श्री.तुळजादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जालना संचलित अपंग निवासी विद्यालय, वाटूर, तालुका-परतूर, जिल्हा-जालना या अस्थिव्यंग प्रवर्गातील विशेष शाळेचे जालना, तालुका / जिल्हा-जालना येथे स्थलांतर करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे...

शासन निर्णय:-

श्री.तुळजादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जालना संचलित अपंग निवासी विद्यालय, वाटूर, तालुका-परतूर, जिल्हा-जालना या अस्थिव्यंग प्रवर्गातील विशेष शाळेचे जालना,तालुका/ जिल्हा-जालना येथे स्थलांतर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, या योजनेचे अस्तित्वात असलेले नियम व वेळोवेळी अस्तित्वात येणारे नियम बंधनकारक राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७१०१०१५१९१२६५२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Manisha Y Kamte
Date: 2017.10.10 15:07:07 +05'30'

(म.यु.कामटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री (सामाजिक न्याय),यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) सचिव (सामाजिक न्याय), यांचे स्वीय सहायक, मुंबई ४०० ००१.
३) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग,औरंगाबाद.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद-जालना.
६) समाज कल्याण अधिकारी, जिल्हापरिषद-जालना.
७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
८) जिल्हा कोषाधिकारी, जालना.
९) अध्यक्ष / सचिव, श्री.तुळजादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जालना संचलित अपंग निवासी विद्यालय, वाटूर, तालुका-परतूर, जिल्हा-जालना.
१०) निवडनस्ती (अपंग कल्याण -१)